**ठळक बातम्या**

- पहिल्या जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन शिखर परिषदेचं मुंबईत प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन / देशात सर्जनकेंद्रीत अर्थव्यवस्थेचा उदय होत असल्याचं प्रधानमंत्र्यांच प्रतिपादन /तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढत असताना जगात मानवी संवेदना जागृत ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचं आवाहन

- महाराष्ट्र राज्यस्थापनेचा ६५ वा वर्धापन दिन विविध कार्यक्रमांनी साजरा, पुरोगामी आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी राज्य सरकार सर्व समाजघटकांना सोबत घेऊन प्रगती करत असल्याची राज्यपालांची ग्वाही

- गेल्या महिन्यात २ लाख ३७ हजार लाख कोटी रुपये जीएसटी, संकलन

**आणि**

- चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रांकीरेड्डी यांना मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार प्रदान

**<><><><><>**

देशात सध्या ऑरेंज इकॉनॉमी अर्थात सर्जनकेंद्रीत अर्थव्यवस्थेचा उदय होतो आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत जिओ वर्ल्ड कन्वेन्शन सेंटर इथे सुरू असलेल्या वेव्हज् अर्थात जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन शिखर परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यात आशय, सर्जनशीलता आणि संस्कृती हे महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत असं ते म्हणाले....

**होल्ड... बाईट - नरेंद्र मोदी - ऑरेंज इकॉनॉमी**

तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढत असताना जगात मानवी संवेदना जागृत ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. हजारो वर्षं गीत, संगीत, नृत्य या

कामी आपली मदत करत असून आगामी काळात पण त्याच आधारे आपल्या राहायचं आहे, असं त्यांनी सांगितलं…

**होल्ड… बाईट - नरेंद्र मोदी - टेक्नॉलॉजी**

वेव्हज् हे फक्त एका परिषदेचं संक्षिप्त नाव नाही, तर खरोखर एक सांस्कृतिकतेची, सर्जनशीलतेची, जागतिक स्तरावर परस्परसंबंधांची लाट आहे, असं ते म्हणाले.

यावेळी मोदी यांनी ३२ विविध स्पर्धांमधून अंतिम फेरीत पोहोचलेल्या ८०० स्पर्धकांचं अभिनंदनही केलं.

या परिषदेबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

***व्हॉईस कास्ट-  रश्मी***

*(क्रियेटिव्हिटीला प्रोत्साहन देणं आणि तिला जगभरात पोहोचवण्यासाठी कनेक्टिव्हिटी देणं या उद्देशाने वेव्हज् या पहिल्या जागतिक दृक्श्राव्य  मनोरंजन परिषदेचं आयोजन मुंबईत करण्यात येत आहे. या परिषदेला परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. वेव्हज् परिषदेमुळे देशातल्या आशय निर्मात्यांना जगभरातल्या गुंतवणूकदारांशी संपर्क निर्माण करण्याची संधी मिळत आहे, असं मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. या परिषदेत देशातले ७६हून जास्त नेते आणि उद्योगक सहभागी होत असून यामुळे मनोरंजन आणि नवनिर्मिती क्षेत्रात जागतिक व्यासपीठावर मुंबईचं स्थान बळकट व्हायला मदत होईल, असंही ते यावेळी म्हणाले. वेव्हज् ही केवळ एक परिषद नसून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेली एक चळवळ असल्याची प्रतिक्रिया अभिनेता शाहरुख खान यांनी दिली आहे. या परिषदेला चित्रपटसृष्टीतून शाहरुख खान, रजनीकांत, अक्षय कुमार, विकी कौशल, प्रसून जोशी, सारा अली खान, सैफ अली खान, दीपिका पदुकोण, शाहीद*

*कपूर, बॉबी देओल, आमीर खान, आलिया भट, रणबीर कपूर, मनीषा कोईराला, नुशरत भरुचा, शोभिता धुलिपाला, अनिल कपूर, अनुपम खेर यांच्यासह मनोरंजन क्षेत्रातले अनेक मान्यवर उपस्थित होते.)*

माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात सर्जनशीलतेचं शक्तिकेंद्र म्हणून जगाचं नेतृत्व करायला भारत तयार आहे, हे वेव्हज् परिषदेमुळे लक्षात येत असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी यावेळी केलं. माहिती तंत्रज्ञान, कौशल्य आणि क्षमता ही महाराष्ट्राची बलस्थानं असल्याचं सांगत त्यांनी सर्व जगाला भारताच्या नव्या ‘क्रिएटिव्ह व्हेव्ज'चं स्वागत करण्याचं आवाहन केलं.

माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन येत्या शनिवारी वेव्हज् परिषदेत **इंडियाज लाईव्ह इव्हेंट्स इकॉनॉमी - अ स्ट्रॅटेजिक ग्रोथ इम्पेरिटिव्ह** या श्वेतपत्रिकेचं अनावरण करणार आहेत.

**<><><><><>**

भारतीय चित्रपट छोट्या शहरातल्या प्रेक्षकांसाठीही परवडणारा व्हावा अशी अपेक्षा अभिनेता शाहरुख खान यांनी व्हेव्ज परिषदेत व्यक्त केली. ते या परिषदेत आयोजित केलेल्या फ्रॉम आउटसायडर टू रुलर या विशेष सत्रात बोलत होते. भारतीय चित्रपट आणि करमणूक क्षेत्र अधिक सशक्त होण्यासाठी विविध आंतरराष्ट्रीय चित्रपट संस्था आणि उद्योगांबरोबर करार करण्यावर त्यांनी भर दिला.

अभिनेत्री दिपीका पडूकोण यावेळी म्हणाल्या की व्हेव्ज परिषदेनं चित्रपट, एनिमेशन, ओटीटी, कृत्रिम बुद्धीमत्ता आणि इतर अत्याधूनिक तंत्रांना एकत्र आणलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६५ वा वर्धापन दिन आज राज्यात सर्वत्र साजरा करण्यात आला. यानिमित्त मुंबईत आयोजित मुख्य शासकीय सोहळ्यात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राष्ट्रध्वज फडकवून उपस्थितांना संबोधित केलं. राज्य सरकार सर्व समाजघटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी काम करत असून, यासाठी सगळ्यांनीच एकत्र प्रयत्न करायचं आवाहन राज्यपालांनी यावेळी केलं.

मुंबईत विधानभवनाच्या प्रांगणात विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनीही हुतात्मा चौक इथल्या स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांना अभिवादन केलं. छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखविलेल्या मार्गावर चालणारा महाराष्ट्र कायमच भारताच्या विकासात सर्वात महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

देशात गेल्या महिन्यात २ लाख ३७ हजार लाख कोटी रुपयांच्या जीएसटी, अर्थात वस्तू आणि सेवा कराचं संकलन झालं आहे. गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात २ लाख १० हजार कोटी रुपयांचा महसूल जमा झाला होता. त्या तुलनेत यावेळी या कर संकलनात १२ पूर्णांक ६ दशांश टक्के वाढ झाली आहे.

गेल्या महिन्यात २७ हजार ३४१ कोटी रुपयांचा कर परतावाही दिला असल्याचं सरकारी आकडेवारीत नमूद केलं आहे.

**<><><><><>**

चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रांकीरेड्डी यांना आज युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविय यांनी नवी दिल्ली इथं २०२३ चा मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार दिला. या दोनही खेळाडूंची समर्पण वृत्ती आणि

असामान्य कामगिरीचा हा गौरव आहे असं मांडविय यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

<><><><><>

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडीयमवर मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्स यांचा सामना सुरु आहे. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबई इंडियन्सच्या १२ षटकात १ बाद १२०  धावा झाल्या होत्या.

<><><><><>

महाराष्ट्रात शासकीय कार्यालयांसाठीच्या सुधारणा मोहिमेच्या पहिल्या टप्प्याचं मूल्यमापन आज जाहीर झालं. कार्यक्षम संकेतस्थळ, कार्यालयीन तसंच तक्रार निवारण सुविधा, तंत्रज्ञानाचा वापर अशा दहा मुद्द्यांवर  भारतीय गुणवत्ता परिषदेनं केलेल्या या मूल्यमापनानुसार ४८ विभागांपैकी १२ विभागांनी १०० टक्के उद्दिष्ट प्राप्त केलं आहे.

शंभर दिवसांच्या या मूल्यमापनात महिला आणि बालविकास विभाग सर्वोत्तम ठरला आहे तर त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषी विभाग, ग्रामविकास विभाग आणि परिवहन आणि बंदरे विभाग हे मंत्रालयीन विभाग उदिष्टप्राप्तीत यशस्वी ठरले आहेत.

<><><><><>

जागतिक अर्थव्यवस्थेतलं कामगारांचं योगदान अधोरेखित करण्यासाठी आज कामगार दिन साजरा केला जातो. जगभरातल्या कामगारांचे हक्क आणि कामगारांच्या पिळवणूकी विरोधातली आंदोलनं यांचं प्रतिनिधित्व करणारा हा दिवस, मे दिन म्हणूनही ओळखला जातो.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जागतिक कामगारदिनानिमित्त सर्व कामगारांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांना उद्यापासून विशिष्ट ओळख क्रमांक देण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व रुग्णांच्या वैद्यकीय नोंदी, आजारपणाचा इतिहास इत्यादी माहिती सहज नोंदली जाणार आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री पिट हेगसेथ यांनी आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्यांशी संवाद साधला आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्यात झालेल्या जिवित हानीबद्दल सहानुभूती व्यक्त केली. भारताच्या स्वसंरक्षणाच्या हक्कासाठी तसंच दहशतावाद्याविरुद्धच्या लढ्यासाठी अमेरिकेचा ठाम पाठिंबा असल्याचं त्यांनी सांगितलं.

पाकिस्तान जागतिक दहशतवादाला खतपाणी घालत असल्याचं तसंच भारतीय उपखंडात अस्थैर्य निर्माण करत असल्याचं राजनाथ सिंग यांनी हेगसेथ यांना सांगितलं.

**//<><><><><>//**